




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जर तुम्हाला आनंदी आयुष्य जगायचे असेल
तर माणसांवर किंवा गोष्टींवर...
लक्ष केंद्रित न करता
तुमच लक्ष ध्येयावर केंद्रित करा...


वर्ष : ०५ | अंक : ११, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२६ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## नगरविकास खात्यावर फडणवीस नाराज, बैठकीला शिंदेंची दांडी





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** महायुतीत सारं काही आलबेल आहे का? असा प्रश्न पुन्हा पडताना दिसतोय. कारण यावेळी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात नाराजी नाट्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या खात्यामधील अधिकाऱ्यांवर नाराज असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांची खरडपट्टी घेतल्याचं वृत्त एका वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे. नगरविकास खात्याकडून केंद्र सरकार पैसा पुरवत असलेल्या योजना प्रभावितपणे राबवल्या जात नसल्याचा मुख्यमंत्र्यांचा आरोप आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सह्याद्री अतिथीगृह येथे नगरविकास खात्याची बैठक घेतली होती. या बैठकीत एकनाथ शिंदे उपस्थित नव्हते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. या बैठकीत प्रोटोकॉलनुसार एकनाथ शिंदे उपस्थित असायला हवे होते. तसेच त्यांनी स्वत:हून नगरविकास खातं मागून घेतलं होतं. तरीही मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीत शिंदे यांनी दांडी मारल्यामुळे ते समाधानी नाहीत का? असा प्रश्न उपस्थित होतोय. यातून त्यांच्या नाराजीच्या चर्चांनी जोर धरला आहे.

**एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया**

या नाराजी नाट्याबाबत एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला पण त्यांनी उत्तर देणं टाळलं आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महायुतीचं काम सुरु असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत. अडीच वर्षांचं सरकार तुम्ही पाहिलेलं आहे. महायुतीची दुसरी इनिंग सुरु झाली आहे. यापूर्वीची पहिली इनिंग तुम्ही पाहिलेली आहे. विकासाच्या मुद्द्यालाच आम्ही पुढे घेऊन गेलो आहेत. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी आमची टीम काम करत आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले आहेत.

**देवेंद्र फडणवीस यांचं म्हणणं काय?**

केंद्राच्या अमृत योजनेच्या अंमलबजावणीत विलंब बोत असल्याचा मुख्यमंत्र्यांचं म्हणणं आहे. तसेच यामुळे त्यांनी अधकाऱ्यांच्या बैठकीत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. केंद्राकडून मिळालेल्या निधीचा पूर्ण उपयोग करा, अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी आणि एकनाथ शिंदे काय उत्तर देणार? असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना केला.

**विरोधकांची टीका, कारवाई करण्याची मागणी**

दरम्यान, या वृत्तावर विरोधकांकडून टीका केली जात आहे. खासदार संजय राऊत यांनी शिंदेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. एकनाथ शिंदे हे नगरविकास मंत्री म्हणून पूर्णपणे अपयशी आहेत. नगरविकास खात्यातून मग एमएमआरडीए असेल, काही प्रकल्प असतील, नगरपालिका, महापालिका यांचा निधी केंद्रातून आला असेल आणि त्यांनी तो निधी इतरत्र वळवला असेल, ठेकेदारांच्या माध्यमातून कमिशनगिरी केली असेल तर हा भ्रष्टाचार आहे. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बडतर्फ केलं पाहिजे, असं संजय राऊत म्हणाले.

खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील कारवाईची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याच सरकारमधील एका विभागावर नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर आली. मी त्यांचं अभिनंदन करते. नाराजी दाखवली ती चांगली गोष्टी, पण त्यावर कारवाई काय होणार?, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला.

## केज तालुक्यातील ७२,१४० हेक्टर क्षेत्रावरील पिके विमा संरक्षित !

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२५, केज :** नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंतप्रधान पीक विमा योजने मध्ये केज तालुक्यातील ५८,५५३ शेतकऱ्यांनी १,७१,५१५ एवढे विमा अर्ज विमा कंपनीकडे ऑनलाईन दाखल करीत ७२,१४० हेक्टर क्षेत्रावरील खरीपाची पीके विमा संरक्षित केली आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्याचा विमा एकूण ८ कोटी ३० लाख ४७ हजार ५१३ इतकी रक्कम विमा कंपनीकडे भरली आहे. एकूण पीक विम्यापैकी ९५ टक्के विमा एकट्या सोयाबीनचा उतरवण्यात आला आहे. तालुक्यातील एकूण शेतकरी खातेदारांपैकी ५६ टक्के शेतकरी पीक विमा योजनेत सहभागी झाले आहेत. यंदा राज्य सरकारने सुधारित पीक योजना लागू केली असून यापूर्वीची १ रुपयात पीक विमा योजना बंद केली आहे. याशिवाय पीक नुकसानभरपाईचे तीन ट्रिगर देखील रद्द केल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा शेतकऱ्यांचा विमा योजनेत सहभाग घाटला आहे.

**५६% शेतकऱ्यांचा विमा योजनेत सहभाग**

यंदा मे महिन्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली परंतु, मान्सून पाऊस सर्वदूर अपेक्षित असा झाला नाही. अपुऱ्या ओलीवर शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी, मका, उडीद मुग, कांदा सह इतर पिकांची पेरणी करून घेतली. यात प्रामुख्याने सोयाबीनचा पेरा सर्वाधिक आहे. पेरणी झाल्यानंतर तब्बल एक महिना पावसाने ओढ दिली त्यामुळे काही शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. तर उगवून आलेल्या पिकांची वाढ खुंटली. दरम्यान हलक्या पावसावर पिके काशीबशी तग धरून राहिली. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, दुष्काळ, रोगराई ययासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठे नुकसान होऊन उत्पादनात घट झाल्यास शेतकऱ्यांना विम्याच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळते.

पंतप्रधान पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२५ करिता विमा भरण्यास १ जुलै पासून सुरुवात झाली. ३१ जुलै पर्यंतच्या मुदतीत शेतकऱ्यांचा मिळालेला अल्प प्रतिसाद पाहून १४ ऑगस्ट पर्यंत मुदत वाढवण्यात आली. तालुक्यात एकूण १,०४,००० शेतकरी खातेदार आहेत. त्यापैकी ५८,५५३ शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभाग घेत १ लाख ७१ हजार ५१५ एवढे विमा अर्ज पीक विमा कंपनीकडे ऑनलाईन भरून ७२ हजर १४० इतक्या हेक्टरवरील पिके विमा संरक्षित केली आहेत. शेतकऱ्यांनी विम्यापोटी ८ कोटी ३० लाख ४७ हजार ५१३ रुपये विमा कंपनिकडे भरले आहेत. तालुक्यात पेरणीयोग्य १,०५,२१२ हेक्टर एवढी शेत जमीन आहे. यंदा ६८ टक्के क्षेत्रावर शेतकऱ्यांनी पीक विमा उतरवला आहे. यात सर्वाधिक ९५ टक्के सोयाबीन पिकावरच शेतकऱ्यांनी विमा भरल्याचे आकडेवारी वरून दिसत आहे.

**पीक विमा अर्ज संख्या विमा संरक्षित क्षेत्र (हेक्टर मध्ये)**

| (पीक) | (विमा अर्ज) | क्षेत्र( हे.) |
|---|---|---|
| उडीद | ५५१० | ८७६ |
| कापूस | २३८७ | ६९९ |
| मूग | ६१८५ | १०२८ |
| भुईमूग | १९५ | २९ |
| मका | ९१ | ११ |
| कांदा | ७९७ | १५७ |
| बाजरी | १४९ | ३० |
| तूर | २६९२ | ५६५ |
| ज्वारी | ५३ | १५ |
| सोयाबीन | १५३८३६ | ६८७३२ |

गतवर्षी (खरीप हंगाम २०२४) शेतकऱ्यांनी २ लाख १२ हजार ७२७ विमा अर्ज भरत १ लाख ३८३ हेक्टर क्षेत्रावर विमा भरला होता. यंदा विमा योजनेत सहभागी होण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला होता.तसेच शेतकऱ्यांना आपल्या हिस्याची विमा रक्कम पण भरावी लागली. याशिवाय नुकसान भरपाईचे देखील नियम बदलल्यामुळे यावर्षी विमा अर्जात घट दिसून येत आहे.

**केवळ पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवर आधारित नुकसान भरपाई मिळणार आहे.**

सुधारित विमा योजनेच्या बदलांनुसार, हंगामाच्या शेवटी महसूल मंडळातील १२ गावांच्या निवडक क्षेत्रातील पिक कापणी प्रयोगांतून मिळालेल्या सरासरी उत्पादनाची तुलना मागील १० वर्षांच्या सरासरी उत्पादनाशी केली जाणार आहे.

जर उत्पादन १० वर्षांच्या सरासरीपेक्षा कमी आले तरच त्या महसूल मंडळामधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे. यापूर्वीच्या विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एकूण ४ ट्रिगरच्या आधारे भरपाई दिली जात होती. त्यातील स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान हे ३ ट्रिगर यंदा रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे आता पीक नुकसानभरपाई फक्त पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवर आधारित असणार आहे.

## सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरात पोलीसांचा रुट मार्च

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद उत्सवादरम्यान शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी शहरातील मुख्य मार्गावरुन पंढरपूर शहर पोलीसांचा रुट मार्च काढण्यात आला. सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहर पोलीसांनी शहर पोलीस ठाणे हद्दीतील इंदिरा गांधी चौक, कैकाडी महाराज मठ, जुनी पेठ, मटन मार्केट, नाथ चौक, गांधी रोड, चौफळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेशन रोड असा रूट मार्च घेण्यात आला.



यावेळी शहर पोलीस ठाणे येथील सहा पोलीस अधिकारी ३९ पोलिस अंमलदार, एक क्युआरटी पथक, एक आरसीएफ पथक सहभागी झाले होते. अशी माहिती शहर पोलीस निरिक्षक विश्वजित घोडके यांनी दिली.

## ओव्हरटेक करताना दुपट्टा ट्रकच्या चाकात अडकला अन् तरुणीचा भयंकर अंत



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** नागपूर जिल्ह्यात रविवारी दोन भीषण अपघात घडले आहेत. पारशिवनी तालुक्यातील कन्हान पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्कॉर्पियोने उभ्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. तर कामठी येथे नागपूर-जबलपूर मार्गावर ट्रकच्या चाकाखाली सापडल्याने एका तरुणीचा मृत्यू झाला. या दोन्ही अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू तर आठ जण गंभीर जखमी झाले आहेत.

शनिवारी रात्री तान्हा पोळा साजरा करून वर्धा जिल्ह्यातील सिंधी रेल्वे मार्गावरील गावातून मित्रमंडळी स्कॉर्पियोने परतत होती. त्यावेळी पारशिवनी तालुक्यातील कन्हान पोलिस ठाण्याच्या हद्दीत रात्री सुमारे दीड वाजताच्या सुमारास स्कॉर्पियो उभ्या ट्रकवर आदळली. ही धडक एवढी जबरदस्त होती की, स्कॉर्पियोचा पुढील भाग पूर्ण चकनाचूर झाला. या अपघातात प्रज्वल चव्हाण (निवासी निमखेडा बोरडा) याचा जागीच मृत्यू झाला. तर चेतन वाडीभस्मे, प्रणय कडू, प्रियंश बावणे, आकाश सोनेकर, रितिक चरडे, रितिक गडे हे सर्व निमखेडा बोरडा येथील तसेच प्रणय घोडेस्वार (निवासी बोधनी, ता. मोहाडी, जि. भंडारा) हे सर्वजण गंभीर जखमी झाले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. सर्व जखमींना आणि मृतदेहाला कामठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नातून लासलगाव बाजार समितीला खानगाव व सुभाषनगर (विंचूर) येथे जागा उपलब्ध




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, विंचूर (नाशिक) :** येवला-लासलगाव मतदार संघाचे आमदार तथा राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री मा. छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नातून लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी दोन महत्त्वाच्या जागा उपलब्ध झाल्या आहेत.

यामध्ये सुभाषनगर येथे ८ हेक्टर ६१.५६ आर इतकी जमीन उपबाजार या सार्वजनिक प्रयोजनासाठी नाममात्र ०१ रुपये दराने भाडेतत्त्वावर देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तर खानगाव नजिक खरेदी-विक्री केंद्रासाठी ३.५० हेक्टर जागा उपलब्ध करून देण्याचा शासन दराने संपादित करण्याचा प्रस्तावही वन विभागाकडे दाखल करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे सुभाषनगर व खानगाव नजिक परिसरातील शेतकरी बांधवांना जवळच शेतमाल विक्रीची सुविधा होणार असून, त्यांच्या वेळ व खर्चाची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. यासोबतच अत्याधुनिक सुविधांनी युक्त उपबाजार उभारला जाणार असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

लासलगाव बाजार समितीचे सभापती डी. के. (नाना) जगताप यांनी याबाबत माहिती देत मंत्री छगन भुजबळ यांचे आभार मानले आहे.

## बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात भगवान श्री चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, बुलढाणा :** भगवान श्री चक्रधर स्वामी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ, सुहासिनी गोणेवार, समाधान गायकवाड, जयश्री ठाकरे, तहसीलदार विजय सवडे, वृषाली केसकर व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## राज्यपालांचे श्रीचक्रधर स्वामी यांना अभिवादन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, मुंबई :** महानुभाव संप्रदायाचे संस्थापक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे चक्रधर स्वामींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती तसेच राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस दलातील अधिकारी व जवान उपस्थित होते.




## बकालपणाला लोहमार्गाचे आमंत्रण

गेल्या आठवड्यात मुंबईत मुसळधार पाऊस कोसळला आणि लोकलगाड्यांनी मान टाकली. त्यात शीव आणि कुर्ला या स्थानकांदरम्यान पाण्याचा उपसा करणारे पंप एका वेगळ्याच कारणामुळे बंद पडले. ताशी अडीचशे घनमीटर पाण्याचा उपसा करणारे रेल्वेचे दोन पंप आणि हजार घनमीटर पाण्याचा उपसा करणारे मुंबई महापालिकेचे तीन पंप या भागात आहेत. हे पंप चालवायला लोहमार्गाबाहेरच्या रहिवाशांपैकी काहींनी अटकाव केला. प्रकरण पोलिसांपर्यंत गेले. मात्र तोपर्यंत लोहमार्गांवर ११ ते १९ इंच इतके पाणी ओसंडून आले. धोक्याच्या पातळीच्या वर. चुनाभट्टी, मानखुर्द, कुर्ला या सर्व भागातील म्हणजे मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गातील पाणी खेचणारे ते महत्त्वाचे पंप आहेत. हे पंप पाणीउपसा करून मिठी नदीतच सोडतात. रहिवासी आधीच मिठी नदीच्या फुगवट्यामुळे पाण्यात होते. त्यामुळे त्यांचीही घालमेल स्वाभाविक म्हणता येईल. परंतु मग ही वेळ आलीच का, हा प्रश्न उभा राहतोच. महामुंबईभर लोहमार्ग म्हणजे सर्वांत सखल भाग आणि बकालपणाला आमंत्रण असे चित्र आहे, त्याचा फटका मुंबईकरच सहन करत आहेत.

याउलट दुसरे चित्र मुंबईच्या रेल्वे स्थानकांत दिसते. मुंबईच्या उपनगरी रेल्वे स्थानकांवरील फलाट आजकाल लक्षणीयरीत्या स्वच्छ पहायला मिळतात. नेमकी काय अशी जादू झाली आहे की, स्थानकांवर कागदाचा कपटाही दिसत नाही? स्वच्छता कामाचे आऊटसोर्सिंग हे त्याचे एक कारण आहेच. परंतु या कामातही स्वच्छता कर्मचाऱ्यांवरची निगराणी-नियंत्रण अत्यंत काटेकोरपणे होत आहे. स्वच्छता कर्मचारीही झोकून देऊन काम करीत आहेत. रेल्वेने २००२ मध्ये स्थानके आणि लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या स्वच्छ ठेवण्यासाठी क्लीन ट्रेन स्टेशन (सीटीएस) ही योजना सुरू केली. त्याअंतर्गत पाठीवरून नेता येतील असे यांत्रिक जेटस्प्रे वगैरे उपकरणे वापरून सफाई केली जाते. सुमारे ६८३ रेल्वेगाड्यांमध्ये त्या धावत असतानाच ही सेवा दिली जाते. 'वंदे भारत' गाड्यांमध्ये तर विमानाप्रमाणेच कचरा उचलून घ्यायला पिशवी घेऊन सफाई कर्मचारी फिरतात. तसे पाहिल्यास ही सगळी प्रवाशांच्या आळशी सवयींना मिळालेली बक्षिसीच म्हणता येईल! रेल्वेगाड्यांबाहेरचे चित्र मात्र फारच विदारक आहे. कोकण रेल्वेच्या रमणीय स्थानकांत कोणतीही रेल्वेगाडी थांबली, की लाल मातीचा परिसर चहाच्या कपांच्या कचऱ्यानी पांढराफटक होऊन जातो. काही रेल्वेगाड्यांतील कचरा कंत्राटदारांचे कर्मचारी गाडीबाहेरच टाकतात. भायखळा, कांजूरमार्ग अशा रेल्वेस्थानकांच्या भिंतींवर नक्षीदार महिरपी साकारल्या आहेत. तर झोपड्यांचा कचरा लोहमार्गावर येऊ नये, यासाठी लोहमार्गांच्या भिंतींना जाळ्याही लावल्या आहेत. त्याबाहेरच्या परिसरावर कुणाचेच नियंत्रण नाही.

एखाद्या प्रदेशात रेल्वेमार्ग अवतरणे म्हणजे जणू विकासाची गंगा येणे, असेच मानले जाते. परंतु प्रत्यक्षात रेल्वेमार्गासोबत बकालपणाला निमंत्रण मिळते, असे चित्र आहे. रेल्वे आपल्याभोवतीच्या आपल्याच मालमत्तेबाबत कधीही जागरूक राहिली नाही, हे त्यामागचे एक कारण. शिवाय उर्वरित शहरानेही रेल्वेमार्गाभोवतीचा परिसर अतिक्रमणमुक्त आणि प्रवाशांच्या सोयीचा, सुरक्षित कसा राहील, याकडे कधीही लक्ष पुरविलेले नाही. या पावसाळ्यापूर्वी पश्चिम रेल्वेच्या माहीम रेल्वेयार्ड परिसरात दोन महिन्यांत जवळपास १०० ट्रकभर कचरा उचलण्यात आला. अशा अनेक स्थानकांची उदाहरणे देता येतील. पेण, रोहा, भिवंडी, तुर्भे आणि आता तर उरण अशा वेगवेगळ्या भागांत महामुंबईचे रेल्वेचे जाळे विस्तारले. त्यात वर्षागणिक भर पडणार असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र रेल्वे आली की, त्यांना झोपड्यांचा वेढा, लोहमार्गासभोवती बेकायदा कारवायांचे आगर हे समीकरण ठरून गेले आहे. लोहमार्ग तयार होतानाच रेल्वे आणि स्थानिक प्रशासन यांनी एकत्रितपणे या परिसराचे नियोजन केले, तरच या बकालपणाला दूर ठेवणे शक्य होईल; अन्यथा लोहमार्गाकडे कायम कचराकुंडी म्हणूनच बघितले जाईल.

# आद्य गणेश.. आरंभ गणेश..!

लवकरचं श्री गणेशाचे मोठ्या प्रेमाने, हर्षाने, भक्तिभावाने आगमन होईल. शास्त्रोक्त पद्धतीने भाद्रपद शुक्ल श्री गणेश चतुर्थी पासुन ते अनंत चतुर्दशी पर्यंत बाप्पा आपल्या सर्वांना तन-मन-धनाने सेवा समर्पित करण्याची संधी देणार आहे. महाराष्ट्रात गणेशत्सोवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. धार्मिक परंपरा भक्तिभावाची अतूट जोड आहे. कुठल्याही शुभ कार्यांची सुरुवात श्रीगणेश स्तवनाने तद्वतच पाद स्पर्शानेचं होत असते.

श्री गणेश ही आरंभ देवता आहे. ती वेदांचीही आद्य देवता आहे.ती वेदांनीही प्रतीपादली आहे. आत्मस्वरूपात रमलेली बुद्धी ही श्री गणेश आहे. कैवल्य साम्राज्यमूर्ती माऊली महावैष्णव संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीच्या पहिल्या ओवीत म्हणतात.

ओम नमोजी आद्या
वेद प्रतिपाद्या
जय जयाजी स्वसंवेद्या
आत्मरूपा
देवा तूंचि गणेशु
सकलमति प्रकाशु
म्हणे निवृत्तीदासु
अवधारी जो जी

माऊलींनी गणेशाचे फार सुंदर वर्णन ज्ञानेश्वरीत केलेले आहे. ज्याप्रमाणे माऊलींनी ओमकार हाच परमात्मा आहे, असे कल्पून ज्ञानेश्वरीस प्रारंभ केला. अगदी तसाच शांतीब्रह्म संत एकनाथांनी सुद्धा गजवंदन करून भावार्थ रामायण लेखनास प्रारंभ केला.

वेदवेदांतवेद्या
वंद्यही परमवंद्या
स्वसंवेद्या गणेशा
तुझे निर्धारिता रुप
केवळ स्वरूपाचे स्वरूप
तेथे अवयव कल्पिता अमूप
तव कल्पनेचा लोप स्वरूपी तुझ्या
या लागी जैसा अससी तैसियासी
नमन साकार निराकारासी
तवं अंगत्व मुकले अंगत्वासी
भज्य भजले भजकांसी अव्दैत

अशा शब्दात संत एकनाथांनी भावार्थ रामायणातून गणेश वंदना केली आहे. अनादी अश्या वेद वेदांनाही परम वंदनीय असलेल्या आणि जो केवळ स्वतःला जाणू शकतो. अशा श्री गणेशाला संत एकनाथ भावार्थ रामायणातून वंदन करतात. 'तूं' म्हणजे अरुपाचे रुप आहेस. तुझे अवयव कल्पना न करावी एवढी आहेत. शेवटी कल्पनेचा लोप होतो. त्यामुळे तू जसा असशील साकार वा निराकार रूपात असशील; तसे तुला नमन असो. तुझ्या भक्तीने भक्त आणि तुझ्यातलं व्दैतत्त्व संपून जातं.

श्री गणेशाचे स्तवन हा ग्रंथकाराचा अथवा संत वांङ्‌मयाचा महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. संत तुकारामाने रचलेल्या गाथेतील पुढील अभंगातून श्री गणेशाच्या ओमकार रूपाचे वर्णन वेदवाणीच्या प्रमाणाने दिले आहे.

ओमकार प्रधान रूप गणेशाचे
हे तिन्ही देवांचे जन्मस्थान
अकार तो ब्रह्म उकार तो विष्णू
मकार महेश्वर जाणियेला
ऐसे तिन्ही देव जेथोनि उत्पन्न



तो हा गजानन मायबाप
तुका म्हणे ऐसी आहे वेदवाणी
पहावी पुराणी व्यासांचिया

सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळी जो नादब्रम्ह झाला तो ओमकार आहे. अकार, उकार, मकार या तिन्हीं मात्रांनी ओमकार सिद्ध होतो. यातील अकार विश्वनिर्मितीचे अधिकारी ब्रह्मदेव. उकार श्रीहरी विष्णू सृष्टीचे पालनकर्ते. तर श्री शंकर म्हणजे मकार होय. ब्रम्हा, विष्णू, महेश हे तिन्ही देव मूळ गणेश तत्वापासून निर्माण झाले आहे. तुकाराम महाराज म्हणतात... हे जर खोटे वाटत असेल तर व्यासांच्या पुराणांना विचारावे. श्री गणेश आद्य व आरंभदेवता कशी आहे हे संत साहित्यातून उमगते.

समर्थ रामदास स्वामींनी सुद्धा दासबोध ग्रंथाच्या पहिल्या दशकाच्या दुसऱ्या समासात श्री गणेशाचे स्तवन केलेले आहे.

ओम नमोजी गणनायका
सर्व सिद्धी फलदायका
अज्ञान भ्रांती छेदता बोधरूपा

असे वर्णन केलेले आहे. अशा एकंदरीत श्री गणेश स्तवनाच्या तीस ओव्या आहेत. संत आणि सत् पुरुषांनी केलेल्या व्याख्यानावरून आणि वर्णनावरून श्री गणेशाचे आद्यत्व, निराकत्व,निर्गुणातत्व, आणि त्या मागचा आध्यात्मिक अर्थ स्पष्ट होतो. श्री समर्थांनी रचललेल्या गणेशाच्या आरतीतील भाव फार सुंदर आहे.

दास रामाचा वाट पाहे सदना
संकटी पावावे.. निर्वाणी रक्षावे..
सुरवर वंदना...
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शन हेळामात्रे कामनापुर्ती

इथे त्यातला भाव असा आहे की, तू आमच्या घरी येऊन कधी स्थापन होशील. तुझी स्थापना करून मागणे मागायचे आहे. तुझी उपासना केल्यानंतर तू आम्हाला संकटातून सोडवशील. कारण तू आदी, अंत, मध्य तूच तूं आहे. कारण पालनकर्ता, तारणहार, बुद्धीदाता, विघ्ननाशाय साधकांचा चिंतामणी आहेस. तुला वारंवार नमन.

**जय गणेश.. जय गणेश..!**



शशिकांत तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो.९१३०८३५४५८

# पनवेल मनपाच्या वतीने पर्यावरण पूरक सजावट स्पर्धा व गणेशोत्सवाची सप्तसूत्री जाहीर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, पनवेल :** पर्यावरणाच्या रक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विविध उपक्रम आयोजित केले आहेत. यामध्ये पनवेल महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेश सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विजेत्यांसाठी एकूण एक लाख रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. नागरिकांनी उत्साहाने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. याच बरोबर महापालिकेच्यावतीने पर्यावरण पूरक




गणेशोत्सवाची सप्तसूत्री जाहीर करण्यात आली आहे. या सप्तसूत्रीचा नागरिकांनी अवलंब करावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्साहाबरोबरच पर्यावरण संवर्धन हा मुख्य हेतू साधण्यासाठी 'पर्यावरणपूरक गणेश सजवट स्पर्धेत भाग घेणाऱ्यां स्पर्धेकांनी सजावटीसाठी कागद, कापड, फुलं यासारख्या नैसर्गिक व पर्यावरण पूरक वस्तूंचाच वापर करावा. महापालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जाहीर केलेली सप्तसूत्रीही या स्पर्धेचा आधार ठरणार आहे.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सप्तसूत्री :**

१. गणेशाची मूर्ती शाडू मातीची किंवा लाल मातीची असावी.

२. घरातील लहान मुलांनी घडवलेल्या मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पर्यावरणपूरक वारसा पुढील पिढीला द्यावा.

३. मूर्तीला शक्यतो नैसर्गिक रंगांचा वापर करावा.

४. मखर व सजावट कापड, कागद किंवा फुलांची असावी.

५. आराधनेवेळी पारंपरिक वाद्यांचा वापर करून मंगलमय संगीत कमी आवाजात करावे.

६. विसर्जन घरच्या घरी मोठ्या ड्रममध्ये स्वच्छ पाण्यात मंगलद्रव्य घालून करावे.

७. विसर्जनावेळी आलेले निर्माल्य वेगळ्या निर्माल्य कलशात जमा करावे.

पर्यावरणाचे संक्षणार्थ नागरिकांनी कृत्रिम तलावात बाप्पाचे विसर्जन करण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी महापालिकेच्यावतीने पालिका क्षेत्रात सुमारे ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची निर्मितीचे काम सुरू आहे.

## हरितालिका

व्रत गं हरितालिका
जमतात नर नारी
पुजतात मनोभावे
शिव शंभो शंकरी

निर्मळ होई तनमन
स्वच्छता घरी दारी
निमीत्ताने सणवारी
जमे सखी शेजारी

प्रसन्नता देई सर्वां
रोषणाई छानभारी
सुख माहेरीसासरी
ईश्वरा तव आभारी

पुजा करी परोपरी
पापजळे जन्मांतरी
मेडीटेशन नाव नवे
समाधान हो अंतरी

उपवास कडकधरी
विश्राम मिळे उदरी
स्वार्था सह परमार्थ
इप्सित साध्य करी

नाच गाणे जागरण
कलेस वाव परोपरी
कळे गुण लपलेले
मना मनच्या कोपरी

- हेमंत मुसरीफ, पुणे
मो. ९७३०३०६९९६

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# भारत रशिया मैत्रीचा नवा अध्याय



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकेखोरपणामुळे भारत आणि अमेरिकेचे संबंध कमालीचे दुरावले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावल्यानंतर दोन्ही देशात कटुता निर्माण झाली आहे.

सुरुवातीला भारतावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरीफ) लावणाऱ्या ट्रम्प यांनी भारताने रशियाशी तेल खरेदी करू नये. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने रशिया त्या पैशातून शस्त्र खरेदी करत आहे आणि त्यामुळेच रशिया युक्रेन युद्ध थांबत नाही. भारत रशियाकडून तेल खरेदी करून एकप्रकारे रशिया युक्रेन युद्धाला उत्तेजन देत आहे असा जावई शोध लावतानाच ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून तेल खरेदी केले तर अमेरिका भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावेल असा इशारा दिला अर्थात भारताने त्यांच्या इशाऱ्याकडे डोळेझाक केले त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के अतिरिक्त शुल्क लावले. या अतिरिक्त शुल्कामुळे भारत घाबरून रशियाशी असलेला व्यवहार थांबवेल आणि रशियाकडून तेल खरेदी करण्याचे थांबवेल असे ट्रम्प यांना वाटले होते झाले मात्र उलटेच. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे तर थांबवले नाहीच उलट रशियाशी असलेले जुने मैत्रीचे संबंध आणखी दृढ करण्याचा प्रयत्न केला.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी फोनवरून संवाद साधत चर्चा केली. आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. अमेरिकेशी आलेल्या कटुतेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची असल्याने या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे. एस जयशंकर यांनी या भेटीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष वाल्दिमिर पुतिन यांची भेट घेतली या भेटीत अनेक विषयावर चर्चा झाली मात्र भेटीचा मुख्य अजेंडा हा अमेरिकेची दादागिरी हाच होता. या बैठकीत भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पुतिन यांच्यासमोर अमेरिकेच्या दुहेरी नीतीचा पर्दापाश केला त्यामुळे अमेरिकेला योग्य तो संदेश दिला गेला. अमेरिकेची दुहेरी नीती म्हणजे ज्या अमेरिकेने भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारतावर ५० टक्के शुल्क लावले त्याच अमेरिकेने चीनवर मात्र अतिरिक्त शुल्क लावण्यास ९० दिवसांची स्थगिती दिली. विशेष म्हणजे चीन रशियाकडून भारतापेक्षा अधिक प्रमाणात तेल खरेदी करतो. भारताला दम देऊन अतिरिक्त शुल्क वसूल करणारा अमेरिका मात्र चीन समोर फुसका बार ठरतो हेच यातून सिद्ध होते. अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क लावल्याने दोन्ही देशांच्या संबंधात कटुता निर्माण झाली असल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली असली तरी म्हणतात ना वाईटातूनही चांगले घडते तसेच इथेही घडत आहे. अमेरिका आणि भारताचे संबंध बिघडले असताना भारत आणि रशियाचे संबंध मात्र पूर्वीप्रमाणे दृढ होत आहे.

रशिया हा तसा भारताचा सर्वात विश्वासू आणि सर्वात जुना मित्र. पंडित नेहरूंपासून सुरू झालेली ही मैत्री आजही कायम आहे. ज्या ज्या वेळी भारतावर संकट आले त्या त्या वेळी रशियाने आपली मैत्री निभावली हे मान्यच करावे लागेल. १९६५ आणि १९७१ साली झालेल्या भारत पाकिस्तान युद्धात रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला या उलट अमेरिकेने प्रत्येक वेळी पाकिस्तानची तळी उचलली. आताच्या ऑपरेशन सिंदूरमधील अमेरिकेची भूमिकाही पाक धार्जिणीच होती हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. मधल्या काळात भारत आणि रशियाचे संबंध पूर्वीप्रमाणे दृढ राहिले नव्हते. विशेषतः ट्रम्प पहिल्यांदा सत्तेत आल्यापासून भारत अमेरिकेकडे झुकू लागला असे रशियाला वाटत होते अर्थात त्याला नमस्ते ट्रम्प, हाव दि मोदी हे कार्यक्रम ही कारणीभूत होते शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांचा माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असा जाहीर उल्लेख करत असल्याने तसा रशियाचा समज झाला आणि ते स्वाभाविकच आहे. त्यामुळेच रशिया चीनकडे झुकली होती आता ट्रम्प यांच्या या कृतीने पुन्हा दोन्ही मित्र एकत्र आले आहेत.

रशिया ही महासत्ता आहे आणि भारत होऊ घातलेली महासत्ता आहे. हे दोन देश पुन्हा एकत्र आले त्याचा जागतिक पटलावर मोठा परिणाम होणार आहे. त्याचा सर्वाधिक फटका अर्थात अमेरिकेलाच होणार आहे असे जाणकार सांगतात. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रातील माजी राजदूत निकी हॅले यांनी याच मुद्द्यावर बोट ठेवत ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे ट्रम्प यांच्या या कृतीमुळे अत्यंत महत्वाच्या काळात भारत अमेरिका संबंध तणावपूर्ण बनले आहे. ट्रम्प चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांशी सौम्य भूमिका घेताना भारतासारख्या सौहार्दपूर्ण संबंध असलेल्या देशाशी संबंध बिघडवत आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारत, रशिया आणि चीन यांच्यातील परस्पर संबंध बळकट होईल त्याचा फटका अखेर अमेरिकेलाच बसेल. निकी हॅले यांना जे समजते ते ट्रम्प यांना का समजत नाही हा प्रश्न आहे. पण काहीही असो ट्रम्प यांच्या हेकोखोरपणामुळे भारत रशिया मैत्री संबंधाचा नवा अध्याय लिहिला जात आहे हे मात्र नक्की.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विद्यार्थ्यांनी शेती संस्कृतीला विकसित करण्यासाठी शिक्षण घ्यावे - भाई गोळेगावकर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, पालम (परभणी) :** शेतकरी आणि शेती संस्कृती जगाला नैसर्गिकपणे जगायला शिकवते पण सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे शेतीच्या विस्तारासाठी प्रयत्न केले जात असले तरी मूळ नैसर्गिक शेती संस्कृती विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञान आणि शिक्षणाचा उपयोग करावा असे प्रतिपादन लक्ष्मणराव गोळेगावकर यांनी सोमवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी केले. ते शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेत विजेता ठरलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करताना अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे, माजी प्राचार्य डॉ.हरिभाऊ सातपुते, डॉ.उद्धव निर्वळ, घनश्याम पांचाळ, उपमुख्याध्यापक रामचंद्र दुधाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी स्पर्धा परीक्षा निवड झालेल्या यवतमाळ येथील महसूल अधिकारी शंकर चाळक यांचा ही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संजय बालाघाटे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.कालिदास गुडदे यांनी केले.

## के.रामलू शाळेने राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त कोंडावार यांचा सत्कार




**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, कुंडलवाडी (नांदेड) :** आगीच्या दुर्घटनेत स्वतः चा जीव धोक्यात घालून मुंबईकरांचे जीव वाचवणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील जीगरबाज कर्मचारी योगेश कोंडावारचा राष्ट्रपती शौर्य पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. अंधेरी पश्चिम येथील ओम हिरा पन्ना मॉल येथे लागलेल्या भीषण आगीत स्वतः चा जीव धोक्यात घालून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ७ ते ८ जणांचा जीव वाचवून आगही नियंत्रणात आणून शौर्य दाखवणाऱ्या गोरेगाव अग्निशामक दलातील कर्मचारी योगेश कोंडावार यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्या निमित्ताने के.रामलू शाळेच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला यांसमवेत बिलोली तालुक्यातील कोटग्याळ गावचे पोलीस पाटील सायबू मोगलाजी डोंगरे यांना महसूल विभागात उल्लेखनीय व प्रशासनीय कार्य, विशेष कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी राहुल कर्डीले सहीने गौरवपत्र सन्मान करण्यात आले. तसेच देशपातळीवर अत्यंत अवघड समजली जाणारी NEET / IIT परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थ्यांचे देखील सत्कार करण्यात आला. त्यात प्रसाद दत्ताहारी कदम, विष्णू नागेश आरशेवार, पवन साईनाथ ठक्कूरवार, अनिल नरसिंग ठक्कूरवार, निकिता दत्तात्रय म्याकलवार,अश्विनी शिवाजी म्याकलवार यांचं देखील अभिनंदन करून सन्मान करण्यात आला. यावेळी या संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कूरवार संचालिका रमा ठक्कूरवार या शाळेचे प्रिंसिपल जे.संभाजी व्हाय प्रिंसिपल एम.सपना उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन दत्ता हमंद यांनी केले तर आभार प्रदर्शन भास्कर वाघमारे यांनी केले.

## मनसे कडून इको फ्रेंडली गणेशा संकल्पनेतून २५ शाडू मातीच्या मुर्त्या वाटप



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२४, जुईनगर (नवी मुंबई) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जुईनगर/नेरुळ विभाग आणि माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी अक्षय भोसले (विभाग अध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली जुईनगर/नेरुळ मधील सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गणेश भक्तांना अमित ठाकरे यांच्या इको फ्रेंडली गणेशा या संकल्पनेतून २५ शाडू मातीच्या मुर्त्या देण्यात आल्या. सदर प्रसंगी अभिजीत देसाई ( शहर सहसचिव) व अनिता नायडू (महिला उपशहर अध्यक्षा) यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन सचिन वसंत दोरगे (चिटणीस - महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेना) व शाखा अध्यक्ष मयूर कारंडे, संकेत बोडके व उपशाखा अध्यक्ष प्रमोद खामकर, अर्जुन थापा, अर्जुन वाघमारे, संतोष मोटे यांनी केले.

## साताऱ्यात पंचमुखी गणेशासमोर महाआरती



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२५, सातारा :** जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणा देत व गणपती बाप्पा मोरया, मंगलमुर्ती मोरया असा गजर करत डॉल्बी बंदी, लेजर बंदी झालीच पाहिजे, असा नारा देत गणेशोत्सवात डीजेवर बंदी घालण्यात यावी. या मागणीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी साताऱ्यातील विविध १६ ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या सदस्यांनी एकत्र येत शुक्रवारी सकाळी आपल्या भावना गणपती बाप्पासमोर मांडल्या. पंचमुखी गणेश मंदिरात महाआरती करून या ज्येष्ठ नागरिकांनी डीचे बंदीची भावनिक हाक देत डॉल्बी मुक्तीची सदबुध्दी सर्वांना दे असं साकड घातलं. गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये घुमणाऱ्या डीजेच्या भीषण आवाजाने ज्येष्ठांची अक्षरशः झोप उडवली आहे. हृदयाचे ठोके वाढवणारा हा आवाज ज्येष्ठांसाठी धोकादायक ठरत आहे. लहान मुलांच्या कानांवरही याचा वाईट परिणाम होत आहे. शांततेत, भक्तिभावाने साजरा होणारा हा उत्सव कर्कश आवाजामुळे एक आरोग्य संकट बनत आहे. त्यामुळे सातारा शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध १६ संघटनांनी एकत्र येत डीजे बंदीविरोधी मोहीम सुरू केली आहे.

# वीज केंद्राच्या चिमणीवर चढून प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन

### सामूहिक आत्महत्येचा दिला इशारा; आश्वासनानंतर आंदोलन मागे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, (घुग्घुस) चंद्रपूर :** दिनांक २३ ऑगस्ट रोजी थकित वेतन व रोजगाराच्या मागणीसाठी ८ प्रकल्पग्रस्त कामगारांनी शनिवार, दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास उसेगाव येथील विदर्भ मिनरल्स ॲण्ड एनर्जी कंपनीच्या आवारातील १६५ मीटर उंच चीमणीवर चढून आंदोलन केले. यावेळी त्यांनी सामूहिक आत्महत्या करण्याचा इशारा दिल्याने एकच खळबळ उडाली.

२००८ साली गुप्ता एनर्जी कंपनीने उसगाव परिसरात प्रकल्प उभारणीसाठी १०३ शेतकऱ्यांची जमीन संपादित केली होती. बदल्यात त्यांना कंपनीत स्थायी रोजगार देण्यात आला. मात्र, २०१५-१६ मध्ये कंपनी अचानक बंद पडली व २०१७ साली दिवाळखोर घोषित झाल्याने अनेकांचे वेतन थकीत राहिले. नंतर कंपनीचा कारभार विदर्भ मिनरल्स ॲण्ड एनर्जी कंपनीकडे गेला. कंपनी सुरु झाल्यावर प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले गेले होते. मात्र, ते पाळले गेले नाही.

उलट बाहेरील कामगारांना काम ावर घेण्याची प्रक्रिया सुरु झाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये संताप निर्माण झाला. त्यामुळे १०३ प्रकल्पग्रस्त कामगारांनी कामावर परत घेण्यासाठी विदर्भ मिनरल्स ॲण्ड एनर्जी प्रा.लि. कंपनीविरोधात १८ ऑगस्टपासून धरणे आंदोलन सुरु केले होते. परंतू, कंपनी व्यवस्थापनाने या आंदोलनाची दखल घेतली नाही. त्यामुळे अखेर शनिवारी विजयक्रांती कामगार संघटनेचे प्रवीण लांडगे यांच्या मार्गदर्शनात प्रकल्पग्रस्त महेंद्र वडस्कर, भारत खनके, सुधाकर काळे, सुरेंद्र विके, रमेश सोनेकर, अनिल निखाडे, सुनील जोगी व उमाकांत देठे या ८ जणांनी मध्यरात्री चिमणीवर चढून, जीव धोक्यात घालून 'विरुगिरी' आंदोलन छेडले. परिस्थिती गंभीर होत असताना आमदार किशोर जोरगेवार आंदोलनस्थळी पोहोचले. त्यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली आणि कंपनी व्यवस्थापनाला ही चर्चे साठी बोलावले. आ. जोरगेवार यांच्यै मध्यस्थीनंतर १०३ प्रकल्पग्रस्तांना १० सप्टेंबरपासून सहा महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीवर कामावर घेण्याचे कंपनी व्यवस्थापनाने मान्य केले. तसेच सहा महिन्यानंतर सर्व प्रकल्पग्रस्तांना स्थायी स्वरुपात सामावून घेण्याचे ही मान्य केले. आमदाराच्या उपस्थितीत कंपनी व्यवस्थापनाने याबाबत हमी दिल्याने आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केला तर, हाच खरा बैलाचा व शेतकऱ्यांचा सन्मान होईल - संतोषसिंह रावत



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, मुल (चंद्रपूर) :** कृषी प्रदान देशात आपल्या संस्कृतीचं दर्शन म्हणून शेतकऱ्यांचा राजा अन्नदाता बैल शेतकऱ्यांचा मोठा सण बैल पोळा व दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा आयोजन करुन लहान मुलांना बैलाच्या रूपात नंदीबैलाची ओळख व्हावी म्हणून तान्हा पोळ्याचे आयोजन करण्याची परंपरा अजूनही जोपासली जात आहे.

बैल पोळा व तान्हा पोळा हा शेतकऱ्यांचा सण असतो पण तोच आज संकटात सापडला असून कर्जबाजारी झाला आहे. त्याकरीता शासनाने शेचकऱ्यांचा सातबारा कोरा करावे तरच हा खरा शेतकऱ्यांचा सन्मान होईल, असे विचार आपल्या मार्गदर्शनातून संतोषसिंह रावत यांनी केले. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता पासून गांधी चौक मुल येथे मॉ. दुर्गा मंदिर समिती, युवाशक्ती व्यायाम मंडळ, व संतोष सिंह रावत मित्र परिवर तर्फे भव्य तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. उत्कृष्ट नंदी सजावट करिता पाच बक्षिसे, उत्कृष्ट वेशभूषा करिता पाच बक्षिसे तसेच विजेते स्पर्धक वगळून उर्वरित सहभागी स्पर्धकांसाठी लकी ड्रॉ पारितोषिक ठेवण्यात आले होते. यात आकर्षक प्रथम बक्षीस (रूपल रावत) यांचे तर्फे वॉशिंग मशीन जुगेश गोवर्धन, मानकरी ठरले, उत्कृष्ट नंदी सजावट,

प्रथम बक्षीस (संतोषसिंह रावत) यांचेकडून प्रियांशु झरकर मानकरी. द्वितीय बक्षीस (राकेश रत्नावार) कडून मानकरी कान्हा मोहबंशी, मिडीयम सायकल, तृतीय बक्षीस (राजू पा. मारकवार) कडून मानकरी अंश दुधे, सायकल, चौथा रोख बक्षीस १५०० (सुनील शेरकी) कडून स्वर चांभारे यांना, पाचवा बक्षीस रोख १००० रुपये अतुल गोवर्धन यांचेकडून स्मरण डोंगरे यांनी प्राप्त केला. तर उत्कृष्ट वेशभूषा सीन सिनेरी, मध्ये प्रथम बक्षिस (संतोषसिंह रावत) यांचेकडून मानकरी रिया पुपरेड्डीवर हिला रेंजर सायकल, द्वितीय बक्षीस (राजेंद्र कन्नमवार) यांचेकडून विदिशा हेडाऊ, हिला मिडीयम सायकल, तृतीय बक्षीस (नश्याम येनुरकर) यांचेकडून सायकल मानकरी वत्सल वाढई ठरले. चौथा बक्षीस (संदीप कारमवार) यांचेकडून अद्वितीय कीर्तीवार यांना १५००/ रोख, पाचवा रोख बक्षीस(विवेक मुत्यलवार) यांचेकडून १०००/ मानकरी ठरले अन्याय साखलवार यांना रोख देण्यात आले. मंदिर समितीचे अध्यक्ष प्रदेश कॉंग्रेसचे महासचिव तथा सीडीसीसी बँकेचे माजी अध्यक्ष संतोषसिंह रावत व सभापती राकेश रत्नावार, उपसभापती राजेंद्र कन्नमवार, विलास कागदेलवार, गुरुदास चौधरी व युवा शक्ती व्यायाम मंडळाचे पदाधिकारी, रूपल रावत, गुलाब पठाण, प्रवीण चेपुरवार, तेजस महाडोळे, दीपक चुगाणी, चतुर मोहुर्ले, चंदु चटारे, सुनील मगर, चेतन नंदाराम, मंदिर समितीचे पदाधिकारी यांचे हस्ते देण्यात आले.

बैल पोळा व तान्हा पोळा हा शेतकऱ्यांचा सण असतो पण तोच आज संकटात सापडला असून कर्जबाजारी आहे. करिता शासनाने शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करावे, हाच खरा शेतकऱ्याचा सन्मान होईल. असे विचार आपल्या मार्गदर्शनातून संतोषसिंह रावत यांनी केले.

सर्व स्पर्धकांना टिफीन बॉक्स देण्यात आले. डिम्पी गोयल यांचेकडून आकर्षक बक्षीस दिले. स्पर्धेचे परीक्षण समिती सचिव संजय पडोळे, शिक्षक संजय घोटेकर, शंकर दडमल, संतोष गावतुरे, प्रतिमा उमक, प्रिया चेपुरवार, सोनाली गदेवार यांनी केले असून आयोजकांच्या वतीने यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

मंचावर विवेक मुत्यलवार, संदीप मोहबे, विष्णू सादमवार, सुरेश फ ुलझेले, नलिनी आडपवार, रुपाली संतोषवार, लीना फुलझेले, शामला बेलसरे, समता बनसोड यांचेसह दोन्ही संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. गायक रोशनी वासंवार, सुनील माहोरे व प्रशांत बन्सोड यांच्या गायनाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे संचालन सुनील शेरकी यांनी केले आभार गुरु गुरनुले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी युवा शक्ती व्यायाम मंडळाचे दुर्गा मंदिर समितीचे सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## वन अकादमीमध्ये हवामान बदल व पर्यावरण संरक्षण विषयावर कार्यशाळा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी (वन अकादमी) चंद्रपूर येथे हवामान बदल व प्रतिबंध या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत बल्लापूर तालुक्यातील विविध शाळेतील ८४ विद्यार्थी आणि १२ शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. हवामान बदल व त्यांचे दुष्परिणाम या विषयी विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी तसेच या गंभीर समस्येवर शिक्षण आणि विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून वनप्रबोधिनी चंद्रपूरचे संचालक श्रीनिवास रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

प्रशिक्षणाचे उद्घाटन अपर संचालक (प्रशिक्षण) उमेश वर्मा, सत्र संचालक एस. एस दहीवले, एस. के. गवळी, खुशाल रामगीरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षणाचा प्रसार करण्याचे महत्व पटवून दिले व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी समाजात पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्याची गरज व्यक्त केली. या कार्यशाळेत पर्यावरण व परिस्थितीकी, हवामान बदल - कारणे व परिणाम त्यावरील प्रतिबंध व उपाययोजना, हवामान बदल रोखण्यासाठी वन व वन्यजीव संरक्षणाचे महत्व, टाकावू पदार्थाचे हरित पर्यावरणपूरक नियोजन इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सहभागी झालेल्या विद्यार्थी व शिक्षकांसाठी श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डन येथे अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध वनस्पती आणी त्यांची हवामान समतोल व कार्बन शोषणात भूमिका व जैवविविधतेचे महत्त्व समजावून घेण्याची संधी मि ळाली.

चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शालेय संस्थामधील विद्यार्थ्यांकरीता अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम आयोजित करून युवा पिढीचा पर्यावरण संवर्धनात सक्रीय सहभाग वाढविण्याकरीता वन प्रबोधिनी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन अपर संचालक उमेश वर्मा (प्रशिक्षण) यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी नरेंद्र चेटूले, कुमार पस्पुनुरवार आणी वन प्रबोधिनीतील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## अवैध रेती वाहतूक करणारी हायवा महसुल प्रशासनाची कारवाई



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षकांचे पथक, जिल्हाधिकाऱ्यांचे पथक व तहसीलदारांचे पथक अवैधरित्या होणाऱ्या वाळू उपसा व वाहतूकीवर कारवाई करण्यासाठी तत्पर असून आतापर्यंत दंडात्मक कारवाईत ३० लाखांवर दंड या ०८ महिण्यात वसुल झाला आहे तरीही गोदावरीच्या पात्रातून बेसुमार वाळू उपसा व वाहतूक सुरुच असून तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ११ च्या सुम ारास एक हायवा अंदाजे ४ ब्रास रेती पांढरवाडी ते पाटनुर रोडवर अवैधरित्या रेती वाहतूक करत असताना पकडण्यात आली. या हायवाचा क्रं.एम एच २६- इ एच -४७१४ आहे मालकांचे नाव सुभाष दिगांबर कळसे शंखतीर्थ यांची असून या वाहनात ४ ब्रास रेती होती वाहनांवर ६७७६९ एवढा दंड लावण्यात आला असून उर्वरित वाहनांवरील दंडाचे आदेश उपविभागीय अधिकारी भोकर हे आदेश निर्गमित करणार आहेत. सदरील वाहन बारड पोलीसांच्या ताब्यात जप्त करुन देण्यात आले आहे

तपासणीदरम्यान संबंधित वाहन चालकाकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक असलेले कोणतेही वैध परवाने अथवा दस्तऐवज नव्हते. त्यामुळे प्रशासनाने सदर वाहन ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.या पथकात तहसीलदार आनंद देऊळगावकर, राजकुमार मस्के, गोपाळ माने, विकास गलांडे, स्वामी या कारवाईनंतर तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी पत्राद्वारे कळविले आहे की , तालुक्यात कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर रेती वाहतूक सहन केली जाणार नाही. पर्यावरण व नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. अवैध उत्खनन किंवा वाहतुकीत सामील असणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

# माजी नगरसेवक बाबाजी पाटील यांनी शिवसेनेचा झेंडा घेतला हाती...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, कल्याण (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महापालिकेतील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक राजन मराठे आणि त्यांच्या पत्नी ज्योती राजन मराठे तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे माजी नगरसेवक बाबाजी पाटील यांनी आज आपल्या असंख्य पदाधिकाऱ्यांसोबत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांच्यासह मनसेचे उप शहराध्यक्ष किशोर कोशी, म नसे विद्यार्थी सेनेचे सुरज मराठे, रवींद्र बोबडे, संजय तावडे, केतन खानविलकर, सुधीर थोरात आणि अनेक पदाधिकाऱ्यांनीही शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला.या सर्वांचे पक्षात एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले. त्यांना भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि मनसेमध्ये खंडार पडली आहे. दिग्गज नेते शिवसैनिक गटामध्ये गेल्यामुळे. सध्या शिंदे गटामध्ये इन्कमिंग जोरदार सुरू झाले आहे. शिंदे गटाची कल्याण ग्रामीण मध्ये पक्ष वाढताना दिसत आहे.



शिंदे गटाची आता टाकत वाढताना दिसत आहे.पक्षप्रम ुख महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची कामाची पद्धत पाहून, नागरिकांच्या ज्या पद्धतीने समस्या सोडवत आहे. हे सर्व पाहून सर्वांनी प्रवेश केला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आणि शिवसेनेचा झेंडा हाती घेतला. ठाण्यात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, कल्याण जिल्हाप्रमुख राजेश कदम, शिवसेना सचिव राम रेपाळे, दिवा शहर अध्यक्ष रमाकांत मढवी तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# शेतकरी प्रश्नावरील रस्ता रोको यशस्वी, पण रुपेश ढवण यांचे आमरण उपोषण सुरूच...

## शेतकरी, वारकरी, व्यापारी व ग्रामस्थ यांचा मोठा सहभाग...

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** कांदा भाववाढ, कांदा निर्यात बंदी उठवावी, शेतकरी कर्ज माफी या व इतर शेतकरी प्रश्नांवर आमरण उपोषणाला बसलेले युवा शेतकरी नेते रुपेश ढवण यांच्या आंदोलनाला पाठिंबा म्हणून पारनेर तालुक्यातील शेतकरी, वारकरी, व्यापारी व ग्रामस्थ यांनी आज रविवार दि.२४ रोजी निघोज गाव बंद ठेवून ३ तास भव्य रस्ता रोको केला, पण युवा शेतकरी नेता रुपेश ढवण यांनी मात्र प्रश्नांची तड लागत नाही, तो पर्यंत आम रण उपोषणाचा निर्धार आजच्या ५ व्या दिवशी कायम ठेवला आहे .

आज रविवारी सकाळी १० वाजता रूपेश ढवण यांची टाळ, पखवाद वाजत व अभंग गात उपोषण स्थळापासून ते ग्रामदैवत असलेल्या श्री मळगंगा मातेचे यथा सांग दर्शन घेतल्यानंतर, निघोजच्या बस स्थानक परिसरातील मुख्य रस्त्यावर मोठ्या संख्येने उपस्थित



असलेल्या शेतकरी, वारकरी, व्यापारी व ग्रामस्थ यांच्या समवेत ३ तास भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

यावेळी महिला शेतकरी यम ुनाबाई पांढरकर, दादा वराळ, बाळासाहेब लंके, रामचंद्र सुपेकर, सदाशिव पठारे, आबाजी भुकन, चेअरमन किरण सुपेकर, गणेश पवार व इतरांनी शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडत, प्रसंगी सरकार वर शाब्दिक आसूड ओढले.

यावेळी हभप पवन महाराज तनपुरे भिकाजी पठारे, दौलत सुपेकर, संदीप वरखडे, राजू लाळगे, अप्पासाहेब वराळ व मोठा जनसमुदाय उपस्थित होता. सुत्रसंचालन अनिलराव लंके यांनी केले.

**शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ. भास्करराव शिरोळे यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडत राज्य सरकारवर टीका केली.**

शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिलराव शेटे यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत शासकीय अधिकाऱ्यांनी या आंदोलना कडे दुर्लक्ष केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

तर पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ता उनवणे यांनी सरकारच्या वतीने लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात दिलेले आश्वासन न पाळल्याबद्दल नाराजी व्यक्त करत रुपेश ढवण यांच्या या आंदोलनाची दखल घ्यायला हवी असा मुद्दा मांडत, कांदा निर्यात धोरण सुरू करून शेतकऱ्यांना शेतीसाठी कमीत कमी व्याजात कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे.

प्रगतशिल शेतकरी महेंद्र पांढरकर यांनी सरकारचे शेतकऱ्यांच्या बद्दल कसे चुकीचे धोरण आहे, याचा लेखा जोगा मांडला.

**प्रमुख मनोगत व्यक्त करताना उपोषण कर्ते व शेतकरी नेते रूपेश ढवण म्हणाले की, हे शेतकरी आंदोलन माझ्यासाठी नाही, तर शेतकऱ्यांसाठी आहे, आता नाही, तर कधीच नाही. आज हा रस्ता रोको, थांबविण्यात येत आहे, पण सरकारने ठोस निर्णय घेतल्याशिवाय माझे आमरण उपोषण थांबणार नाही. हा उपोषणाचा दुसरा टप्पा असून मी या आधी आमदार, खासदारांच्या आंदोलनाला एवढा जनसमुदाय उपस्थित नव्हता, त्या पेक्षा जास्त जनसमुदाय आजच्या या रस्ता रोको आंदोलनाला उपस्थित आहे. कांद्याला एक दिवस तरी सोन्याचा भाव मिळेल. शेतकरी जगला, तरच सर्व व्यवसाय चालतील, त्यामुळे शेतकऱ्यांसाठी माझा हा लढा असाच पुढे ही सुरू राहणार आहे, असा निर्धार ही ढवण यांनी व्यक्त केला.**

# आंतरराज्य गांजा तस्करीचा पर्दाफाश; कल्याण पोलिसांची मोठी कारवाई

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२५, कल्याण (ठाणे) :** परिमंडळ ३ कल्याण पोलिसांनी आंतरराज्य गांजा तस्करी करणाऱ्या टोळीवर धडक कारवाई करून तब्बल ११५ किलो गांजा, पिस्तूल, काडतुसे, वॉकीटॉकी संच, मोटारकार, ॲटो रिक्षा, दुचाकी वाहने व रोख रक्कम असा एकूण ₹७० लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला असून १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई कल्याण, बदलापूर, ठाणे, सोलापूर जिल्हा तसेच आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम येथे राबविण्यात आली. पोलिसांच्या विशेष पथकाने गुप्त माहितीच्या आधारे शिताफीने तपास करून आरोपींच्या हालचालींवर बारीक नजर ठेवली. तपासादरम्यान आरोपींनी विशाखापट्टणम येथील जंगल परिसरातून गांज्याची वाहतूक करण्यासाठी वॉकीटॉकी संचाचा वापर केल्याचे निष्पन्न झाले.

**: कारवाईत जप्त मुद्देमाल :**

११५ किलो गांजा (किंमत – ₹२८.७५ लाख)
१ पिस्तूल व २ जिवंत काडतुसे
२ वॉकीटॉकी संच चार्जरसह



२ मोटारकार, १ ॲटो रिक्षा, १ बुलेट, १ ॲक्टीव्हा
रोख रक्कम
**एकूण किंमत – ₹७०,०३,०००/–**

**: अटक आरोपी :**

१) बाबर उस्मान शेख (२७)
२) गुफरान हनान शेख (२९)
३) सुनिल मोहन राठोड (२५)
४) आझाद अब्दुल शेख (५५)
५) रेश्मा अल्लावुद्दीन शेख (४४)
६) शुभम उर्फ सोन्या शरद भंडारी (२६)
७) सोनु हबीब सय्यद (२४)
८) आसिफ अहमद अब्दुल शेख (२५)
९) प्रथमेश हरीदास नलवडे (२३)
१०) रितेश पांडुरंग गायकवाड (२१)
११) अंबादास नवनाथ खामकर (२५)
१२) आकाश बाळु भिताडे (२८)
१३) योगेश दत्तात्रय जोध (३४)

यापैकी ६ आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत.

**वरिष्ठांचे मार्गदर्शन व पोलिसांची कामगिरी**

ही कारवाई मा. पोलीस आयुक्त आशितोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त संजय जाधव व उप-आयुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पो.नि. मारूती आंधळे, पो.नि. साबाजी नाईक तसेच अनेक अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

कल्याण पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे आंतरराज्य अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळीचे समूळ उच्चाटन झाले असून परिसरात सुटकेचा श्वास सोडण्यात येत आहे.

# पूरग्रस्तांना शासन सर्वतोपरी मदत करणार : पालकमंत्री सावे

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२५, मुखेड (नांदेड) :** पूरग्रस्तांना शासन सर्वतोपरी मदत करणार असून पूरग्रस्तांनी खचून जाऊ नये शासन खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा आहे. लवकरच मुख्यमंत्र्यांशी बैठक लावून यावर तात्काळ उपायोजना करणार असल्याचे पालकमंत्री सावे यांनी पूरग्रस्तांना आश्वासन दिले. रविवार दि.२४ रोजी नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी पूरग्रस्त भागाचा दौरा करून पाहणी केली. यात प्रामुख्याने हसनाळ, रावणगाव, मुक्रमाबाद यासह पूरग्रस्त भागाचा समावेश आहे. रविवार दि.२४ रोजी दुपारी तीन वाजताच्या दरम्यान पालकमंत्री अतुल सावे यांचा ताफा मुक्रमाबाद येथील बामणी रोडवर असलेल्या बालाजी खंकरे यांच्या शेडवर दाखल झाला. या महापुरात खंकरे यांचे ४० ते ५० म्हशी, गाई व लहान वासरे दगावली होती. यावेळी पालकमंत्र्यांनी त्यांना शासन तुमच्या पाठीशी असून लवकरच मुख्यमंत्र्यांशी बैठक घेऊन तुम्हाला तुम्हाला न्याय मिळवून देईल हा माझा शब्द आहे असे आश्वासन दिले.

यावेळी मुखेडचे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्यासह लेंडीप्रकल्प व सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार राजेश जाधव, पोलीस अधिकारी, मुक्रमाबादचे स.पो.नि.राजू चव्हाण व पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

**साहेब आम्हाला इच्छामरणची परवानगी द्या...**

दि.१७ रोजी आलेल्या महाप्रलयंकारी म हापुरात ४० ते ५० म्हशी, गाई व जनावरे दगावली तर ट्रॅक्टर सह सर्व साहित्य वाहून गेले. त्यामुळे हे कुटुंब पूर्णतः उद्ध्वस्त झाले असून या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा सहाराच या महापुराने काढून घेतला आहे. त्यामुळे साहेब आम्हाला शासनाची मदत करा. जर मदत होत नसेल तर आम्हाला इच्छामरणाची परवानगी द्या असे या कुटुंबातील सदस्यांनी पालकमंत्री सावे यांच्यासमोर आपल्या भावना मांडल्या.

दि.१७ रोजी मध्यरात्री अडीच वाजताच्या दरम्यान मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद सह लेंडी प्रकल्प बाधित गावात ढगफूटी सदृस्य अतिमुसळधार पाऊस झाल्याने लेंडी नदीला महाप्रलयंकारी पूर आले या महापुरात अनेकांचे संसार उघड्यावर पडले यात सहा जणांचा बळी गेला. हसनाळ, रावणगाव, भिंगोली, भेंडेगाव, मुक्रमाबाद यासह अनेक गावांना याचा तडाका बसला. त्यात हसनाळ व रावणगाव या दोन गावांची फार मोठी हानी झाली असून येथील घरे पूर्णतः पाण्याखाली आल्याने नागरिकांचे जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले मध्यरात्री अचानक आलेल्या पावसामुळे कुठलीच हालचाल करता आले नसल्याने घरातील सर्व संसार उपयोगी साहित्याची नासाडी झाली. घरे पडली, जनावरे वाहून गेली काहींना आपले प्राणही गमवावे लागले.

तर या महापुरात शेकडो हेक्टर शेत जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. या भागातील पूरग्रस्तांना पालकमंत्री अतुल सावे यांनी आश्वस्थ करून तुम्हाला शासन वाऱ्यावर सोडणार नाही तुमच्यासाठी मी मुख्यमंत्रीशी बोलून योग्य तो निर्णय घ्यायला लावण्यास भाग पाडेन व लेंडी येथील पूरग्रस्तांना न्याय मिळवून देईल असे आश्वासन पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

# थोडक्यात

## खार्डी छ.शिवाजी चौकात दररोज ट्राफिकची समस्या




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२५, दिवा (ठाणे) :** खार्डी छ.शिवाजी चौकात दररोज होते ट्राफिक, स्थानिक भूमिपुत्र ट्राफिक पासून नागरिकांची सुटका करताना दोन दिवस दिसत आहे. खास करून अभिजीत आलिमकर दोन दिवस ट्राफिक काढताना दिसत आहे. या चौकामध्ये रस्त्याच्या दोन्ही साईडला कॉंक्रिटीकरणाचे काम चालू असल्यामुळे मध्यभागी दोन गाड्या जाऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच रस्त्यामध्ये मोठ-मोठे खड्डे झाले आहेत. या चौकामध्ये दररोज सायंकाळी वाहतूक कर्मचारी ठेवण्याची गरज आहे. मुंब्रा वाहतूक निरीक्षक अतुल अहिरे यांना ही माहिती देण्यात आली आहे. दोन दिवस झाले वाहतूक कर्मचारी पाठवून देत आहेत. कोकणात जाण्यासाठी शेकडो बसेस आज दिव्यातून रवाना झाल्या. मात्र दोन ते तीन तास त्यांना ट्राफिक मध्ये अडकावे लागले. स्थानिक नागरिकांना पाच मिनिटाच्या अंतरावर जाण्यासाठी तीन तास लागले. या चौकातलं काम ठेकेदाराला लवकरात लवकर करण्यासाठी ठाणे आयुक्तांनी आदेश द्यावे. आणि स्थानिक भूमिपुत्रांना दिलासा द्यावा.

## पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्यांची धाकधुक वाढली

### नव्याने पडणार झेडपी, पं.स.साठी आरक्षण

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२५, सातारा :** आमच्या गट, गणामध्ये 'हे' आरक्षण पडले नाही. आता 'आमचेच' आरक्षण पडणार... असा अंदाज बांधून बसलेल्यांचा भ्रमनिरास होणार आहे. ग्रामविकास विभागाने आज राजपत्र प्रसिध्द केले असून, आता मागील आरक्षण सोडतीचा विचार न करता, चक्रानुक्रमानुसार नव्याने आरक्षण सोडत होणार आहे. आरक्षण सोडतीबाबत ही पहिली निवडणूक होणार असल्याने आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुले दिवाळीनंतर लागण्याची दाट शक्यता आहे. पहिल्यांदा महानगरपालिका, नगरपालिका अथवा जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका लागणार, हे अद्यापही निश्चित नाही. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यात उत्सुकता ताणून राहिली आहे.

## गुन्हेगारांना आता येरवड्यात आसरा नाही...

### पोलिसांची जाहीर गर्जना...

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२५, येरवडा (पुणे) :** येरवडा परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या सराईत गुन्हेगारांचा पर्दाफाश झाला आहे. पोलिसांनी थेट पाच जणांची नावे रेकॉर्डवर जाहीर करताच परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या कारवाईत या टोळीचे गुन्हे एकामागून एक समोर आले.

लुटमार, मारामाऱ्या, धमक्या, दहशत माजवणे अशा सर्व कृत्यांत या टोळीचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. या आरोपींमध्ये सचिन अशोक रणपिसे (वय,३५), सुरज उर्फ किल्या दादा बाणेकर (३५), मोहमद उर्फ रहेमान शेख (१९), महेश बलभीम सरोदे उर्फ बबल्या शेख (२२) आणि नंदकुमार संजय पासंगे (२२) यांचा समावेश असून, हे सर्वजण येरवड्यातच वास्तव्यास आहेत. परिसरातील नागरिकांसाठी ते सतत त्रासदायक ठरत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र शेळके यांच्या पथकाने ही माहिती गोळा करून पुढे केली.

नागरिकांचा कायद्यावरील विश्वास टिकून राहावा यासाठी या गुन्हेगारांविरोधात पोलिसांकडून आणखी कठोर कारवाई होणार आहे, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला. सदर कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह-आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर आयुक्त मनोज पाटील, उप-आयुक्त सोमय मुंडे आणि सहा. पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत व.पो.नि. रवींद्र शेळके, निरीक्षक पल्लवी मेहेर, निरीक्षक विजय ठाकरे यांच्या देखरेखीखाली उपनिरीक्षक महेश फटांगरे व सर्व्हेलन्स पथकातील अंमलदार सचिन शिंदे, मोनिका पवार, नितीन वाळुंज, राहुल वाळके, संदीप धादवड यांनी सहभाग घेतला.

या कारवाईमुळे परिसरात समाधानाचे वातावरण असून, गुन्हेगारांना आता पुण्यात आश्रय नाही! असा ठाम संदेश समाजात पोहोचला आहे.

## मिरा रोड जेष्ठ नागरिक संघटनेचे जेष्ठ नागरिकांचे भव्य कार्यक्रम

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२५, मीरा भाईंदर :** मीरा रोडमधील ज्येष्ठ नागरिक संघटना तर्फे २३.०८.२०२५ रोजी सायं ६ वा. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय मधील हॉल मध्ये जेष्ठ नागरिकांनी डान्स व गाणे म्हणून कार्यक्रम साजरा केला. तसेच ऑगष्ठ महिन्यात ज्या जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस होते त्यांना शुभेच्छा व भेट देण्यात आले. ही संघटना गेली १९ वर्षे नियमितपणे ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम आयोजित करते. या संस्थेचे सुमारे ३०० ज्येष्ठ सदस्य आहेत. काल पोलिस आयुक्तालयात झालेल्या या कार्यक्रमात सदस्यांनी कविता, नृत्य, गायन आणि गरबा यासारख्या उपक्रमांचा आनंद घेतला. ही संस्था नियमितपणे गोवा, राजस्थान, गुजरात आणि इतर ठिकाणी आपल्या सदस्यांसाठी पिकनिकचे आयोजन करते. याशिवाय योग, वैद्यकीय शिबिरे यासारखे कार्यक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. येथे होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व ज्येष्ठ लोक जेवणाच्या वेळी स्वतःच्या हातांनी भांडी धुणे अशी सर्व कामे स्वतःच्या हातांनी करतात. येथील कार्यक्रमात गाणी गाताना दुःखद गाणी म्हणण्यास मनाई आहे. संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती सरोज मेहरा, अश्विनी मोदी सचिव ह्यांच्या मते, आम्हाला जोमाने जगायचे आहे. ही संस्था अनेक घरांमध्ये पीडित ज्येष्ठ नागरिकांना मदत देखील करते. हया कार्यक्रमात पत्रकारांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.